नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६५ Issue - 165 | वार - मंगळवार दि. १० नोव्हेंबर २०२६ Blow- Tuesday Date 10 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

धाराशिवमध्ये भीषण अग्नितांडव; एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

दिवाळीच्या आनंदासाठी संपूर्ण कुटुंब एकत्र आलं होतं; येडशी गावावर पसरली शोककळा, सर्वत्र हळहळ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव : धाराशिव जिल्ह्यातील येडशी गावात काल (८ नोव्हेंबर) मध्यरात्री घडलेल्या भीषण अग्नितांडवाने संपूर्ण गाव सुन्न झालंय. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहाही जणांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. तर एक जण या आगीतून बचावला आहे. या कुटुंबातील सिद्धी आणि गायत्री दोन मुली शिक्षणासाठी बाहेरगावी राहत होत्या. एक मुलगी पुण्यात, तर दुसरी धाराशिवमध्ये शिक्षण घेत होती. दिवाळीचा सण असल्याने दोघीही आपल्या कुटुंबासोबत सण साजरा करण्यासाठी गावी आल्या होत्या. मात्र ज्या दिवाळीच्या आनंदासाठी संपूर्ण कुटुंब एकत्र आलं होतं, त्याच दिवाळीत काळाने या कुटुंबावर घाला घातला. सदर घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रभर एकच हळहळ व्यक्त होत आहे. याच दरम्यान मध्यरात्री नेमकं काय घडलं?, याबाबत थरारक माहिती प्रत्यक्षदर्शी गावकऱ्यांनी दिली आहे.

पहिल्यादा घटनास्थळी पोहोचलेली आणि वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांनी थरारक घटनेची माहिती दिली. दुकानाच्या बाहेरच्या बाजूला सुरुवातीला आग लागली असल्याचं प्रथम दर्शनीने सांगितलं. आगीचा विळख्याने घराचा बाहेर पडण्याचा दरवाजा ब्लॉक झाला. समोरच्या बाजूला आगीचा भडका एवढा होता की नारळाचे आणि पिंपळाचे झाड देखील शेंड्यापर्यंत जळाले, अशी माहिती प्रत्यक्षदर्शीने दिली. पहिल्या मजल्यावर झोपलेल्या



दोघांचा जळून मृत्यू झाला. अक्षरश: त्यांचे पाय देखील मृतदेहापासून वेगळे झाले. तर वरच्या मजल्यावर असणाऱ्या चौघांचा गुदमरून मृत्यू झाला. किराणा दुकान कॉस्मेटिक दुकान आणि कपड्याचे दुकान जळून खाक झाले. कॉस्मेटिकच्या धुरामध्ये विषारी धुर मिसळल्याने गुदमरून मृत्यू झाला असावा असा अंदाज आहे.

धाराशिव जिल्ह्यातील एडशी गावात आज मध्यरात्री करंडे कुटुंबीयांच्या घराला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारी आहे. दिवाळीसारख्या आनंदाच्या, मांगल्याच्या आणि प्रकाशाच्या सणात एका कुटुंबावर काळाने असा घाला घालावा, ही बाब अतिशय वेदनादायी आहे. ज्या घरात सणाचा आनंद आणि उत्साह असायला हवा होता, त्या घरात आज दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने संपूर्ण धाराशिव जिल्हा शोकसागरात बुडाला. सदर घटनेनंतर एक हादरवणारी माहिती समोर आली आहे. अग्निशामक दल उशिरा आल्याने आग आटोक्यात आणणं शक्य झालं नाही. त्यामुळे जेसीबीच्या सहाय्याने भिंती फोडून गावकऱ्यांनी धूर बाजूला करण्याचा प्रयत्न केला. हातोड्याने भिंती फोडल्या. सुरुवातीला आतून वाचवण्यासाठी आवाज येत होता. मात्र त्यानंतर आवाज बंद झाला आणि सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, असं अंगावर काटा आणणारा प्रसंग स्थानिक गावकऱ्यांनी सांगितला. सदर आगाची घटना घडल्यानंतर अग्निशमन दल वेळेवर पोहोचले नाही. तसेच अग्निशामक दलाकडे त्यांची साधनसामग्री देखील नव्हती. अग्निशामक दलाच्या गाडीमध्ये पाणी आणि डिझेलही नव्हतं, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. अग्निशामक दलाच्या गाडीमध्ये डिझेल पुरेसं नव्हतं. त्यामुळे रात्री डिझेल येडशीत आल्यावर भरायला लागले. पाणी भरण्यासाठी आणि डिझेल भरण्यासाठी वेळ गेला आणि त्यामुळे कुटुंबाला वाचवण्यात यश आलं नाही. गाडी वेळेवर आली असती तर तीन ते चार लोकांचा जीव वाचवता आला असता, असा संताप गावकऱ्यांनी व्यक्त केला. किराणा दुकानाच्यावरच्या मजल्यावर कुटुंब राहत होते. त्यामुळे आगीतून बाहेर पडू न शकल्याने गुदमरून मृत्यू झाला. ध्यरात्रीपासून गावकरी आणि अग्निशाम क दलाकडून आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरु होते. मात्र आगीने रौद्र रूप घेतल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. धाराशिव शासकीय रुग्णालयात मृत अवस्थेत सगळ्यांना दाखल केल्याची डॉक्टरांची माहिती आहे. दिवाळीनिमित्त घरात लावलेल्या पणतीमुळे आग लागली असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आगीचे ठोस कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

रशिया-युक्रेन युद्धामध्ये शांततेचा तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू; पंतप्रधान मोदींचा झेलेंस्कींना फोन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेंस्की (तेश्रेवूी नशश्रशपीजू) यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली आहे. या संभाषणादरम्यान अध्यक्ष झेलेंस्की यांनी युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धातील सद्यस्थिती आणि ताज्या घडामोडींवर आपली भूमिका मांडली. त्याचवेळी रशिया आणि युक्रेन युद्धात शांततेचा तोडगा काढण्यासाठी योगदान देण्यास भारत कटिबद्ध असल्याचा विश्वास मोदींनी झेलेंस्की यांना दिला.

पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या मानव-केंद्रित दृष्टिकोनाचा पुनरुच्चार करत स्पष्ट केले की, या युद्धाचा आणि वादाचा उकल केवळ 'संवाद आणि मुत्सद्देगिरी' (ऊऱरश्रेसींश रपव ऊऱश्रिारलू) च्या माध्यमातूनच शक्य आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत सर्वतोपरी योगदान देण्यास नेहमीच तयार आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले. या संवादाची माहिती स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत दिली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, युक्रेनमधील सुरू असलेले युद्ध, त्याचे मानवी पैलू आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या विविध प्रयत्नांवर विचार मांडल्याबद्दल मी अध्यक्ष झेलेंस्की यांचे आभार मानतो. या समस्येवर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्याच्या दिशेने सर्व शक्य प्रकारे योगदान देण्यासाठी भारत कटिबद्ध आहे, याचा मी पुनरुच्चार केला.

कर्करोगविरोधी १,३६४ औषधांच्या सुधारित एमआरपी लागू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : कर्करोगाच्या रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने कर्करोगविरोधी औषधांच्या कमाल किरकोळ किमतींवरील व्यापारी लाभांशाची मर्यादा निश्चित केली आहे. या निर्णयानुसार १,३६४ औषध फॉर्म्युलेशन्सच्या सुधारित एमआरपी ९ नोव्हेंबर २०२६ पासून लागू झाल्या आहेत. औषधांच्या किमतीत झालेल्या कपातीमुळे ग्राहकांची दरवर्षी अंदाजे ₹३,५४०.३८ कोटींची बचत होण्याची अपेक्षा आहे.

रसायन आणि खते मंत्रालयाच्या औषधनिर्माण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या छझझ ने हा निर्णय घेतला आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आरोग्यसेवा महासंचालनालयाने १७ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशींच्या आधारे कर्करोगविरोधी १३७ औषधांच्या एमआरपीवरील व्यापारी लाभांशाची मर्यादा निश्चित करण्यात आली. ८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ८५ औषधनिर्मिती कंपन्यांनी १२१ औषधांशी संबंधित १,३६४ कर्करोगविरोधी औषध फॉर्म्युलेशन्सच्या सुधारित एमआरपी जाहीर केल्या आहेत. यापैकी ६७९ ब्रँड्सच्या किमतीत ५० टक्क्यांहून अधिक कपात नोंदवण्यात आली आहे. औषधांच्या एमआरपीमध्ये सर्वाधिक ९६.४५ टक्क्यांची कपात झाली आहे. कर्करोगाच्या उपचारांसाठी लागणाऱ्या औषधांचा खर्च अनेक रुग्णांसाठी मोठे आर्थिक आव्हान असतो. औषधांच्या किमती कमी झाल्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे ग्राहकांची दरवर्षी अंदाजे ₹३,५४०.३८ कोटींची बचत होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

ग्राहकांना औषधांच्या आवेष्टनावर छापलेली सुधारित एमआरपी तपासता येणार आहे. तसेच 'झहरीार डरहळ ऊरा' या मोबाइल पद्वारे किंवा छझझ च्या अधिकृत संकेतस्थळावरून औषधांच्या किमतींची पडताळणी करता येईल.

सुधारित दरांपेक्षा अधिक पैसे आकारल्यास तक्रार करा

कोणताही केमिस्ट किंवा रुग्णालयातील फार्मसी सुधारित एमआरपीपेक्षा अधिक पैसे आकारू शकणार नाही. एखाद्या विक्रेत्याने निर्धारित दरापेक्षा अधिक किंमत आकारल्यास ग्राहकांना तक्रार नोंदवता येणार आहे. नोंदवता येईल.

ग्राहक 'झहरीार गरप डरारवहरप' पोर्टलद्वारे तक्रार दाखल करू शकतात. तसेच छझझ च्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून औषधांच्या किमतींबाबत तक्रार किंवा शंका तक्रारीसाठी हेल्पलाइन : १८००-११-१२५५- कर्करोगविरोधी औषधांच्या किमती नियंत्रणात आणण्याच्या या निर्णयामुळे उपचारांचा खर्च कमी होऊन रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



हायकोर्टाचे आदेश; शासननियुक्त ४ सदस्यांसह गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक होणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : कोल्हापूर दूध संघ म्हणजे गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत निर्माण झालेल्या पेचावर आज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वाचे आदेश दिले आहेत. राज्य सरकारने जारी केलेला अध्यादेशाला स्थगिती देण्याची मागणी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली आहे. अध्यादेश बरोबर की नाही ते अद्याप ठरलेलं नाही. ते पुढच्या सुनावणीमध्ये ठरण्याची शक्यता आहे. पण सध्या न्यायालयाने अध्यक्षपदासाठी निवडणुकीचे आदेश दिले आहेत.

न्यायालयाकडून गोकुळच्या अध्यक्षपदासाठी उद्या १० नोव्हेंबरला मतदान घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. विशेष म्हणजे सरकारने नियुक्त केलेल्या चार संचालकांना देखील मतदान करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पण ही मते वेगळी ठेवण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार चार मते वेगळी ठेवली जाणार आहेत. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार, आता उद्या ठरल्याप्रमाणे गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक होईल. निवडून आलेल्या २५ सदस्यांसोबत शासनाने नियुक्त केलेले ४ ही सदस्य मतदान करतील. शासनाने नियुक्त केलेल्या चार सदस्यांची मतदान केलेली मते वेगळे ठेवले जाणार आहेत. सर्व प्रक्रियेची व्हिडिओग्राफी केली जाणार आहे.



न्यायालयाच्या आदेशानुसार, निकाल जाहीर केला जाणार आणि अध्यक्षही निवडला जाईल. राज्य शासनाच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार देण्यात आला आहे. संबंधित अध्यादेश बरोबर की चूक हे अद्याप ठरले नाही. पण निवडणूक घेण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर रोजी होईल, असं जाहीर करण्यात आलं आहे. संपूर्ण निवडणुकीची प्रक्रिया अंतिम निकालाच्या अधिन असेल, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

कोल्हापूर गोकुळ प्रकरणात औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली, त्यात मंगळवारी ठरल्याप्रमाणे निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. ज्या चार संचालक सदस्यांचा वाद आहे, त्या सदस्यांचे मत वेगळे ठेवावेत, त्यांची मते मोजणीत ग्राह्य धारावीत, मात्र त्यांना वेगळ्या ठिकाणी ठेवण्यात यावीत असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेची व्हिडिओग्राफी करण्यात यावी, पुढील सुनावणी २५ नोहेंबर रोजी होईल त्यावेळी आलेल्या निकालानुसार प्रक्रियेत बदल होतील असे निर्देश देखील खंडपीठाने दिले. अशी माहिती याचिकाकर्ते वकील श्रीकृष्ण गणबावले यांनी दिली.

बुधवार, गुरुवार अंक नाही

आज मंगळवार, १० नोव्हेंबर रोजी दीपावली पाडवा व ११ नोव्हेंबर २०२६ रोजी भाऊबीज निमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या बुधवार ११ व गुरुवार १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

अश्रू पुसण्याचा प्रयत्न

दिवाळीचा सण संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असताना, दुसरीकडे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतीची घोषणा केली आहे, त्यांच्या या घोषणेची सर्वत्र चर्चा रंगली आहे. सणासुदीच्या काळात फराळ आणि शिधावाटपापुरते मर्यादित न राहता, थेट शेतकऱ्यांच्या दारात पोहोचून शिंदेंनी त्यांच्या सर्व अडीअडचणींची जबाबदारी स्वीकारली आहे. संकटकाळात हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार देण्यासाठी शिवसेनेकडून मदत करण्यात येत आहे. तांगडे यांच्या बारावीत शिकणाऱ्या मुलीने पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न व्यक्त केले, तेव्हा मुख्यमंत्री शिंदेंनी तात्काळ तिच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे निर्देश दिले. याशिवाय, दुष्काळामुळे ज्या शेतकरी कुटुंबांमधील मुलींची लग्ने रखडली आहेत, त्या सर्व मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च शिवसेना करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. आर्थिक संकटात सापडलेल्या तांगडे कुटुंबाने दाखवलेली आपुलकी आणि दिलेली ज्वारी-बाजरीची भेट मनाला हेलावून टाकणारी होती, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ५७४ प्रस्तावित उपाययोजना आणि १६.७४ कोटींच्या निधीला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान आणि युनियन बँकेचे २८ कोटींचे कर्ज माफ करण्याच्या कामाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पीककर्जासह अल्प व दीर्घमुदतीच्या शेतीनिगडित कर्जमाफीच्या मागणीवर मंत्रिमंडळात सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

सौ. तेजाबाई मिटकर : सक्षमपणे ग्रामपंचायतीचा कारभार हाकणाऱ्या महिला सरपंच

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

तुळजापूर तालुक्यातील वागदरी ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंच सौ. तेजाबाई शिवाजी मिटकर ह्या सक्षमपणे गाव कारभारचा गाडा हाकणाऱ्या महिला सरपंच म्हणून त्यांनी आपली स्वतःची ओळख निर्माण करून इतरांनी आदर्श घ्यावा अशा प्रकारे सरपंच पदाला न्याय देणासाठी धडपणारे व्यक्तिमत्व होय. असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही.

ऑक्टोबर - नोव्हेंबर २२२ मध्ये त्यानी लोकनियुक्त सरपंच म्हणून जनतेतून निवडून येशून सरपंच पदाचा पदभार स्विकारला.आज त्यांना संरपंच पदाचा परभार स्विकारून चार वर्षे पूर्ण होत आहेत.या चार वर्षाच्या कालखंडामध्ये त्यांनी वागदरी येथे विविध विकास कामे केलेली असून अनेक विकास कामे प्रस्तावित आहेत. शासनाच्या जल जिवन मशिन अंतर्गत हर घर जल या योजनेतून त्यानी गावातील प्रत्येक घराला पाणी पुरवठा करण्यासाठी संपूर्ण गावात पाईप लाईन केलेली असून भविषात या पाईप लाईनचा उपयोग पाणी पुरवठ्यासाठी होणार आहे.

यावर्षी वरूण राजाने पाट फिरवल्याने पाऊस पडलाच नाही असे म्हटले तरी चालेल त्यामुळे शेतकरी राजा तर संकटात आलाच पण अनेक विकास कामानाही खिळ बसुलेली आहे.इंधन विहीरची (बोरवेल्स) पाण्याची पातळी दिवसेन दिवस खालावत जावून भविषात पाणी टंचाई होणार याची जाणिव ठेवून पाणी टंचाईवर उपायोजना करण्यासाठी त्यांची धडपड चालू आहे.तरी परंतु मागील तीन वर्षाच्या कालखंडात त्यांनी भूमिगत गटार,एलईडी लाईटचे टावर, अंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम, मुस्लिम स्मशानभूमी कडे जाणारा जोडा रस्ता स्मशान भूमीला संरक्षण भिंतीचे काम भीम नगर येथील समाज मंदिरापुढे फ`वर ब्लॉक बसवण्याचे काम त्याचप्रमाणे भीम नगर मधील तिनही समाज मंदिराला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव २०२६ निमित्ताने रंगरंगोटीचे व दुरुस्तीचे काम त्यांनी केलेले आहे.पशू पालकाना वैयक्तीक लाभाच्या योजनेतून म्हसी, शेळ्या मिळवून दिल्या आहेत.

त्याचबरोबर गावातील गरजू घरकुल लाभार्थींना प्रधानमंत्री आवास घरकुल,रमाई आवास घरकूल योजनेतून हक्काचे घरकूल मिळवून दिले व देत आहेत.घरकुल योजना गावात सक्षमपणे राबविण्यासाठी गावातील गरजू घरकूल लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी तयार केली आहे. टप्प्या टप्प्याने त्याना घरकुलाचा लाभ मिळणार आहे. आज बऱ्याच लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहेत.मुख्यमंत्री आरोग्य. समृद्ध गाव या आभियानात सहभाग घेवून त्यानी गाव टि.बी. मुक्त गाव केले आहे.



येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी त्यांनी विविध गरजू कामे केलेली आहेत.शाळेच्या विकासासाठी सरपंच पदाचे मिळणारे एक वर्षाचे मानधन त्यांनी शाळेसाठी दिलेले आहे. गावातील सार्वजनिक कार्यक्रम किंवा वैयक्तिक कार्यक्रम,कौटुंबिक कार्यक्रम असो त्या सर्व कार्यक्रमात व सुख दुःखात सक्रिय सहभाग घेतात.त्यामुळे त्यांचा एक वेगळा ठसा गावातील जनतेमध्ये उमटलेला आहे.

त्यांचे पती शिवाजी मिरकर गुरुजी हे शैक्षणिक क्षेत्रात ३०-३५ वर्षे नोकरी करून अनेक पिढ्या घडवण्याचं काम त्यांनी केलेल आहे.शेवटी ते एक आदर्श मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवेत असताना त्यांनी केवळ नोकरी आणि माझं कुटुंब इथपर्यंतच मर्यादित न राहता गावच्या सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून नवीन पिढीला मार्गदर्शकाच्या भूमिकेत योग्य दिशा देण्याचे काम सातत्याने सेवा भावी वृत्तीने करतात. आज जरी ते तांत्रिकदृष्ट्या शैक्षणिक क्षेत्रातून सेवानिवृत्त झाले असले तरी मुळातच सामाजिक कार्याची आवड असलेल्या गुरुजींनी आता समाजशिक्षक म्हणून स्वतःला जोडून घेतलेले आहे. आपल्या सहचरणीच्या कार्यात ते सतत सावलीसारखे सोबत असतात त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करतात. सरपंच पती म्हणून त्यांनी कधीही आपला टेंबा न मिरवता एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून गावातील सर्व जनतेची समन्वयाने संपर्क ठेवून गोरगरिबांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी

त्यांच्या परिने सातत्याने प्रयत्न करतात. त्यांच्या अनुभवाचा उपयोग सरपंच सौ. तेजाबाई मिटकर यांना मोठ्या प्रमाणात होतो.अगदी अबाल वृद्धांनी त्यांच्याकडे काही अडचणी सांगितल्या तरी त्यांचे समाधान होईपर्यंत सरपंच आणि गुरुजी हे त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतात.

महिला सरपंच म्हणून काम करत असताना त्यांनी कधीच खचल्या नाहीत किंवा सरपंच पदाचा आव आणला नाही. कितीही वरदळीला आलेला व्यक्ती असेल त्याला शांतपणे उत्तर देऊन त्याचं समाधान करण्यात सरपंच सौ. तेजाबाई मिटकर यांचा मोठा हातखंड आहे.सरपंच म्हणून काम करत असताना मी कुठे चुकत असेल तर मला माझी चूक लक्षात आणून देण्यासाठी कोणीही संकोच बाळगू नये मला समजून घ्यावं आणि आपण सर्वांनी मिळून जे काही गावातील विकास कामे असतील ते करूया.आपला हा गावगाडा सर्वांच्या समन्वयातून पुढे घेऊन जाऊया असं ते म्हणतात आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीही करतात. सक्षमपणे गाव कारभार हाकणाऱ्या महिला सरपंच म्हणून त्यांची आपली ओळख निर्माण केले आहे.त्यांच्या पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

एस.के.गायकवाड
मु.पो.वागदरी ता. तुळजापूर

अजित पवारांच्या अपघाताबाबत मोठा खुलासा करणार : रोहित पवार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राष्ट्रावादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी पत्रकारांनी रोहित पवारांना शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर केलेल्या आरोपांबाबत प्रश्न विचारले. या आरोपांवर रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिली. रामदास कदम यांनी काय आरोप केले ते मी ऐकलेले नाही. पण काही लोकांनी फोन करुन मला सांगितलं की, रामदास कदम यांनी अजित पवार यांच्या अपघाताच्या घटनेत सुनील तटकरे यांचं नाव जोडलं आहे. माझं एकच मत आहे की, अजित पवार यांच्या अपघाताचा घटनेचा तपास ज्या पद्धतीने व्हायला पाहिजे त्याप्रमाणे होत नाही, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

अजित पवार यांच्या अपघाताबाबत आम्हाला घातपाताची शंका आहे. पण सत्तेत असणारी लोकं त्या शंकेचं निरसन करत नाही. तपास योग्य दिशेने जात नाही. अजित दादांचा तपास संत गतीने सुरु आहे. त्यामुळे याबाबतीत आम्हालाही शंका वाटायला लागली आहे. सत्ताधारी लोकंच मुद्दामून योग्य पद्धतीने तपास करत नाहीत. तरीसुद्धा एकदा दिवाळी होऊ द्या. १४ किंवा १५ नोव्हेंबरला मुंबईत आता शेवटचं आणि महत्त्वाचं अनेक दिवसांचं माझं प्रेझेन्टेशन राहिलेलं आहे ते घेईन. त्याबाबतीत मी जो खुलासा करणार आहे त्या आपल्यासाठी नक्कीच आश्चर्याचा असणार आहे, असं मोठं वक्तव्य रोहित पवारांनी केलं.

रोहित पवारांकडून शंका व्यक्त

महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात अजित पवार यांच्या अपघाताच्या घटनेबाबत शंका आहे. ९० टक्के लोकांना अजितदादांचा अपघात नसून घातपात झाल्याचा शंका आहे. आम चंसुद्धा तेच मत आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात या प्रकरणात एफआयआर होत नसेल तर अजितदादांच्या अपघातात जो जबाबदार आहे त्याला सत्ताधारीच वाचवत आहेत, असा आरोप रोहित पवारांनी केला.

विलीनीकरणाच्या प्रश्नावर रोहित पवार काय म्हणाले?

विलीनीकरणाची चर्चा असती तर माझ्याशी खासदार सुप्रिया सुळे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हे देखील बोलले असते. या महाराष्ट्रात भाजप विरोधात आणि सत्ताधाऱ्यांविरोधात सगळ्यात जास्त लोकांच्याबाजूने आणि महाराष्ट्र धर्म टिकवण्यासाठी मी बोलतोय. माझ्यासोबत कोणतीही चर्चा झालेली नाही. विलीनीकरणाची चर्चा फक्त अजितदादांच्या पक्षात आहे. माध्यमांमध्ये आहे. पण आमच्या पक्षात कुठेही चर्चा नाही, असं रोहित पवारांनी स्पष्ट केलं.

रोहित पवारांचे रामदास कदमांना आवाहन

अजितदादांचा अपघात झाला तेव्हा संपूर्ण महाराष्ट्र धक्क्यात होता. पण अजित दादांच्या पक्षातून दोनच नेते सातत्याने राजकीय वक्तव्य करत होते. कर्जतचे आमदार असतील किंवा शिवसेनेचे नेते रामदास कदम असतील ते सत्ताधारी आहेत. सत्ताधारी असल्यामुळे त्यांच्या कानावर काही माहिती आली आहे का? त्यांच्यापर्यंत वेगळी काही माहिती पोहचली आहे का? त्या अनुषंगाने ते अशा काही नेत्यांचे नाव घेत आहेत. माझं एवढंच म्हणणं आहे की, फक्त नाव घेऊ नका. पुरावे असतील तर तेदेखील समोर आणा. त्या पुराव्यांचा नक्कीच अजित पवार आणि आम्हा सर्वांना न्याय देण्यासाठी प्रयत्न होईल, असं आवाहन रोहित पवारांनी केलं.

रोहित पवारांचा प्रफुल्ल पटेलांवर निशाणा

आता १० तारीख उद्याच आहे. प्रफुल्ल पटेल उद्या शरद पवारांना भेटतात का ते बघा. मला वाटत नाही की ते भेटतील. मुद्दा एवढाच आहे की, तुम्ही शरद पवारांना भेटायला कशासाठी गेला होता, तब्येतीची विचारपूस गेला होता? तिथे बसून तुम्ही तुमच्या पीएच्या मोबाईलवरुन व्हिडीओ काढता आणि तो बाहेर पाठवता. हे कितपत योग्य आहे? त्यामुळे कदाचित तुमचा हेतू शरद पवारांच्या आरोग्याची विचारपूस करण्याचा नव्हता तर फक्त तुमच्या पक्षामध्ये गोंधळ निर्माण व्हावा, सुनेत्रा पवारांवर दबाव निर्माण व्हावा हे दाखवण्यासाठी तुम्ही शरद पवारांना भेटला का? असादेखील प्रश्न निर्माण होतो, असं रोहित पवार म्हणाले.

रोहित पवारांचा पटेल-तटकरेंवर गंभीर आरोप

अजितदादांचा अपघात झाला त्यावेळेस प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे काय म्हणत होते की, विलीनीकरणावर कुठेही चर्चा झालेली नाही. पण तुम्हा सर्वांना माहिती आहे, पहिले अधिवेशन मुंबईत होतं तेव्हा मी पुरावा दाखवला होता. त्या पुराव्यात सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल चोरुन पक्षावर ताबा घेण्याचा प्रयत्न करत होते. म्हणजे कुठे ना कुठे, या राज्याचं उपमुख्यमंत्रीपद आणि अर्थमंत्रीपद या दोन नेत्यांपैकी एकाला घ्यायचं होतं. त्यामुळे ते पक्ष चोरत होते. पण त्यांचा प्रयत्न फसला कारण आम्ही पुरावा दाखवले, असा दावा रोहित पवारांनी केला.

अजित दादा गेल्यानंतर राजकीय वक्तव्ये केले होते ते आता फिरवलं आहे. त्यांच्या पक्षात त्या दोन नेत्यांचं काही चालतं असं मला वाटत नाही. त्यांची गळचेपी होत असल्याने आता ते वक्तव्य फिरवले असेल. पण खरं त्यांच्या तोंडून आता निघालं, असा टोला रोहित पवारांनी लगावला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची दुष्काळग्रस्तांसाठी मोठी घोषणा, मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च आणि शिक्षणाची हमी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. जालना दौऱ्यादरम्यान अंबादास तांगडे या शेतकऱ्याच्या घरी भेट दिल्यावर एक अत्यंत भावनिक प्रसंग घडला. तांगडे यांच्या बारावीत शिकणाऱ्या मुलीने पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न व्यक्त केले, तेव्हा मुख्यमंत्री शिंदेंनी तात्काळ तिच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे निर्देश दिले.

याशिवाय, दुष्काळामुळे ज्या शेतकरी कुटुंबांमधील मुलींची लग्ने रखडली आहेत, त्या सर्व मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च शिवसेना करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. आर्थिक संकटात सापडलेल्या तांगडे कुटुंबाने दाखवलेली आपुलकी आणि दिलेली ज्वारी-बाजरीची भेट मनाला हेलावून टाकणारी होती, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला.

५७४ उपाययोजना आणि कर्जमाफीवर महत्त्वाची चर्चा

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ५७४ प्रस्तावित उपाययोजना आणि १६.७४ कोटींच्या निधीला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान आणि युनियन बँकेचे २८ कोटींचे कर्ज माफ करण्याच्या कामाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पीककर्जासह अल्प व दीर्घमुदतीच्या शेतीनिगडित कर्जमाफीच्या मागणीवर मंत्रिमंडळात सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

शेताच्या बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी; शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत दिला दिलासा

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुःखावर फुंकर

शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे : सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगली, (जि. मा. का.) : एका बाजूला दुष्काळाच्या झळा, दुसऱ्या बाजूला डोळ्यांसमोर वाळून गेलेली पिके, शेतीसाठी केलेला लाखोंचा खर्च वाया गेल्याने डोळ्यात पाणी अशा स्थितीतील बळीराजाच्या वंचना जाणून घेऊन त्याच्या या दुःखावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज फुंकर घातली.

शेतकऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हरवू नये, यासाठी मंत्री महोदयांनी आटपाडी तालुक्यातील पिंपरी खुर्द येथे थेट शेतकऱ्याच्या बांधावर जावून त्यांच्या व्यथा जाणल्या. शेतकऱ्याच्या घरी जाऊन कुटुंबीयांसमवेत भोजन केले आणि शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली. संकटाच्या या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा दिलासा त्यांनी यावेळी दिला. यावेळी आमदार सुहास बाबर, तहसीलदार शीतल बंडगर यांच्यासह जिल्हा परिषद, पंचायत समितीचे पदाधिकारी, अधिकारी,



कर्मचारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार पिंपरी खुर्द गावाची निवड करण्यात आली.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, दुष्काळग्रस्त शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी करण्यामागे केवळ सणाचा आनंद वाटणे एवढाच उद्देश नाही, तर त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष समजून घेणे आणि आगामी काळातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक नियोजन करणे, ही शासनाची भूमिका आहे. पुढील सहा महिन्यांतील संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने उपाययोजनांचे नियोजन केले आहे. यामध्ये शेतकऱ्यांनाही सहभागी करून घेत, त्यांच्या अडचणींची तीव्रता कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या घरी भोजन; दिवाळी शिध्याचे वाटप

भेटीदरम्यान सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते पिंपरी खुर्द येथील ग्रामस्थांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. आरोग्यमंत्री महोदयांसमवेत आमदार सुहास बाबर यांनी नितीन रावसाहेब पाटील यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांसमवेत भोजन केले. शेतकऱ्यांच्या घरातील सदस्यांशी संवाद साधत त्यांनी दिवाळीचा आनंद वर्धित केला. तसेच हनुमान मंदिरात शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

टेंभू योजनेच्या सहाव्या टप्प्यातील काम अंतिम टप्प्यात

नागरिकांशी संवाद साधून दिलासा देताना आमदार सुहास बाबर म्हणाले, आटपाडी तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांवर मात करण्याच्या अनुषंगाने टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सहाव्या टप्प्याला २०१९ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्ध झाल्याने कामाला गती मिळाली आहे. या टप्प्यातील काम अंतिम टप्प्यात असून, योजनेपासून वंचित असलेल्या गावांनाही फेब्रुवारीअखेर पाण्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळी उपाययोजना व अग्रिम मदतीचे वितरण

यावेळी तहसीलदार शीतल बंडगर यांनी प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या दुष्काळी उपाययोजनांची माहिती दिली. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा, चारा डेपो सुरू करण्याची कार्यवाही, पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाच्या विविध मदतींचे वितरण याबाबत त्यांनी माहिती दिली. पीक नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून, पात्र शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत मोठ्या प्रमाणात वितरित करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याने मांडली व्यथा

प्रारंभी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी जगन्नाथ जाधव यांच्या शेतातील दुष्काळामुळे नुकसान झालेल्या केळीच्या बागेची पाहणी केली. जाधव यांनी अडीच एकर क्षेत्रात ऑगस्ट महिन्यात केळीची बाग लावली होती. या बागेसाठी आतापर्यंत सुमारे साडेपाच लाख रुपये खर्च केला होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पाण्याची तीव्र कमतरता निर्माण झाल्याने काढणीच्या टप्प्यावर आलेली केळीची बाग कोलमडली. केळीचे घड सुकले आणि डोळ्यांसमोर उभे केलेले उत्पन्नाचे स्वप्न उद्ध्वस्त झाले.

जाधव यांनी आपली व्यथा मांडताना शेतीसाठी केलेला लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याचे सांगितले. दुष्काळामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून, त्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई देऊन या संकटातून सावरण्यास मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली.

चारा डेपोची मागणी

पिंपरी खुर्दसह परिसरातील तीन गावांमधील सुमारे १ हजार ६०० जनावरांसाठी तातडीने चारा डेपो सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. तसेच, विद्युत वाहिनीचे रखडलेले काम पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली. त्यावर सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यकतेनुसार चारा डेपो सुरू करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दिवाळीत सोलापूरच्या राजकारणात फटाक्यांपेक्षा आरोप-प्रत्यारोपांचे बार!

कोठे-नरोटे वादानंतर म्हेत्रे-कल्याणशेट्टी आमनेसामने; पंतप्रधानांवरील वक्तव्याने भाजप आक्रमक, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांची घणाघाती टीका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर व्हिजन । सोलापूर : दिवाळीच्या सणात सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी सुरू असतानाच सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मात्र आरोप-प्रत्यारोपांची जोरदार फटाकेबाजी सुरू झाली आहे. भाजप आमदार देवेंद्र कोठे आणि काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यातील शाब्दिक संघर्षाची चर्चा सुरू असतानाच आता अक्कलकोटच्या राजकारणात शिवसेनेचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे आणि भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यात नवा वाद पेटला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी म्हेत्रे यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनीही या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध



करत म्हेत्रे यांच्यावर टीकेची तोफ डागली आहे.

सोलापूरच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून वैयक्तिक टीका आणि एकेरी भाषेचा वापर चर्चेचा विषय ठरत आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्याविषयी आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या वक्तव्यावरून काँग्रेस आणि भाजपमध्ये संघर्ष सुरू झाला. काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनीही कोठे यांच्यावर आक्रमक शब्दांत टीका केली. हा वाद थेट मध्यरात्री दोन्ही नेते आमनेसामने येण्यापर्यंत पोहोचला. पोलिसांना मध्यस्थी करावी लागली. त्यानंतर भाजपचे ज्येष्ठ आमदार सुभाष देशमुख यांनीही नेत्यांनी आपले वागणे आणि बोलणे सुधारावे, असा सल्ला दिला होता.

हा वाद शांत होण्याआधीच अक्कलकोटमध्ये नवा राजकीय संघर्ष उफाळला. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी एका कार्यक्रमातील भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचा मुद्दा उपस्थित झाला. त्याला उत्तर देताना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हेत्रे यांच्यावर शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांचा संदर्भ देत जोरदार टीका केली. शेतकऱ्यांची देणी आधी फेडा, त्यानंतर इतरांवर टीका करा, अशा शब्दांत त्यांनी म्हेत्रे यांना सुनावले. यापुढे आपल्या नेत्यांविषयी अशा प्रकारची भाषा वापरल्यास जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, रोहिणी तडवळकर यांनीही या प्रकरणात भूमिका मांडत पंतप्रधानांविषयी बोलताना राजकीय मर्यादा पाळण्याची गरज अधोरेखित केली आहे. राजकीय मतभेद असू शकतात, सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे; मात्र देशाच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीविषयी वैयक्तिक आणि अवमानकारक भाषा वापरणे योग्य नाही, अशी भाजपची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विकासाचे मुद्दे बाजूला, वैयक्तिक टीकेला महत्त्व!

सोलापूर शहरातील कोठे-नरोटे संघर्ष असो किंवा अक्कलकोटमधील म्हेत्रे-कल्याणशेट्टी यांच्यातील वाक्युद्ध, दोन्ही घटनांमुळे जिल्ह्याच्या राजकारणात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, रोजगार, ग्रामीण भागातील शेतीचे प्रश्न, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणि विकासकामे यांसारखे प्रश्न महत्त्वाचे असताना राजकीय नेत्यांचे लक्ष एकमेकांवरील टीकेकडे वळल्याचे चित्र दिसत आहे.

आता या राजकीय संघर्षात आणखी कोणते नेते उडी घेणार आणि वरिष्ठ नेते या वादांवर नियंत्रण मिळविण्यासाठी काय भूमिका घेणार, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. दिवाळीतील राजकीय फटाक्यांची ही आतषबाजी आगामी स्थानिक राजकारणातही सुरू राहणार की नेते संयमाची भूमिका घेणार, हा खरा प्रश्न आहे.

दरम्यान, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा खरपूस समाचार घेतला. म्हेत्रे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी वक्तव्य करताना किमान भाषेचे भान ठेवायला हवे होते. देशाच्या पंतप्रधानांबद्दल बोलताना विचार करून बोलले पाहिजे. राजकीय विरोध असू शकतो; मात्र टीका करताना मर्यादा ओलांडणे योग्य नाही, अशा शब्दांत त्यांनी म्हेत्रे यांना सुनावले.

यावेळी त्यांनी म्हेत्रे यांच्या कारखान्याच्या विक्रीचा मुद्दाही उपस्थित केला. कारखाना नेमका कशासाठी विकला, याचे उत्तर आधी जनतेला द्यावे. लोकांची देणी वाढल्यामुळे कारखाना विकण्याची वेळ आली का, याचा खुलासा म्हेत्रे यांनी करावा. दुसऱ्यांवर आरोप करण्यापेक्षा स्वतःच्या कारभाराचे उत्तर देणे अधिक महत्त्वाचे आहे, असा सवालही तडवळकर यांनी उपस्थित केला.

विशेष म्हणजे, या वादाला आता युतीच्या राजकारणाचीही किनार मिळाली आहे. अशा पद्धतीने राजकारण सुरू राहणार असेल, तर युतीसंदर्भात वरिष्ठ पातळीवर विचार केला जाईल, असा स्पष्ट इशाराही रोहिणी तडवळकर यांनी दिला. त्यामुळे म्हेत्रे यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित न राहता युतीतील राजकीय संबंधांपर्यंत पोहोचण्याची चिन्हे दिसत आहेत.

नरकचतुर्दशी लक्ष्मीपूजन निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर - वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. आज नरकचतुर्दशी लक्ष्मीपूजन निमित्त पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.



श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, हिरा नाम, कौस्तुभ मनी, दंडपेठ्या जोड, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच मोठा, शिरपेच लहान, मोठी बोरमाळ, हायकोल, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तोडे जोड, मत्स्य जोड इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, खड्यांची वेणी, पाचूची गरसोळी, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, पानाड्याचा हार, ठुशी, मास पट्टा, जडावाचे ताणवट जोड, चंद्र, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेठयांची बिंदी, खाड्यांच्या पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, मत्स्य, रूळ जोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्णफुले, सोन्याचा करंडा, तोडे जोड, तारामंडळ, दशावतारीहार इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

राधिका मातेस सिद्धेश्वर टॉप लक्ष्मीहार पुतळ्यांची माळ ठुशी व सत्यभामा मातेस नक्षी टोप ठुशी पुतळ्यांची माळ, जवमनी पदक इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, लफ्फा, दंडपेट्या जोड, झनक झनक हार, तांदळा हार, सूर्यकळी हार, चंद्रहार, शिरपेच, मोत्याची कंठी, लक्ष्मी पदक लॉकेट, चांदीची छत्री व श्री. व्यंकटेशास जवेची माळ, मारवाडी पेट्यांचाहार, इमिटेशन नेकलेस, मोहन माळ, कोयरीहार, तुळशी माळ इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पारंपरिक अलंकाराच्या वेशातील मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्री.श्रीकांत यादव यांनी सांगितले.

रेडे येथील माने कुटुंबीयांसोबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी साजरी केली दिवाळी





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्यानुसार शेतकऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी होण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवेढा तालुक्यातील रेडे येथील शेतकरी माने कुटुंबीयांच्या घरी भेट देऊन दिवाळी साजरी केली. अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारची चिंता करू नये, शासन ठामपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी पालकमंत्री गोरे यांनी माने कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीची तसेच दुष्काळामुळे निर्माण झालेल्या अडचणींची माहिती जाणून घेतली. कुटुंबातील कर्ते पुरुष बंडू भुजा माने हे ऊसतोड कामगार म्हणून कामासाठी बाहेरगावी गेल्याचे त्यांना समजले. त्यानंतर गोविंद भुजा माने तसेच बंडू भुजा माने यांच्या कुटुंबीयांशी त्यांनी संवाद साधला.

दिवाळी सणानिमित्त माने कुटुंबीयांना फराळ व आहेर भेट देण्यात आली. तसेच घरातील लहान मुलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. पालकमंत्री गोरे यांनी मुलांशी संवाद साधत त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. पालकमंत्र्यांनी थेट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दिवाळीचा आनंद द्विगुणित केल्याने माने कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, उपविभागीय अधिकारी अमित माळी, तहसीलदार मदन जाधव यांच्यासह अन्य पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.



एकल महिलांसोबत दिवाळी साजरी; १८ महिलांना साडी व फराळाचे वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि आपलेपणाचा सण. मात्र आयुष्यातील अनेक संकटांना सामोरे जात एकट्याने कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांच्या आयुष्यातही सणाचा आनंद फुलावा, या उद्देशाने रामनगर, कोंडी येथे सेवादायी फाऊंडेशनच्या वतीने 'एकल महिलांसोबत दिवाळी' हा स्नेह उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत परिसरातील १८ एकल व गरजू महिलांना नवीन साडी आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून निवृत्त मेजर तुकाराम भोसले, सेवादायी फाऊंडेशनचे संचालक मरिस्वामी जगले तसेच उमेद अभियानाच्या श्वेता माने उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना सेवादायी फाऊंडेशनचे संस्थापक विष्णू भोसले म्हणाले, एकल महिलांचं दुःख हे शब्दांत मांडता येण्यासारखं नसतं. अनेक महिला आपल्या आयुष्यातील संघर्ष आणि वेदना कोणासमोर व्यक्तही करत नाहीत. कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी एकट्याने सांभाळताना त्या अनेक अडचणींना सामोऱ्या जात असतात. त्यामुळे यंदाची दिवाळी त्यांच्या आयुष्यातही आनंद घेऊन यावी, त्यांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, व एकल महिला एकट्या नाहीत त्यांच्यासोबत आम्ही आहोत हे सांगण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

केवळ दिवाळीपुरतेच मर्यादित न राहता, भविष्यात एकल महिलांची स्वतंत्र समिती स्थापन करून त्यांच्या विविध सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याचा निर्धारही सेवादायी फाऊंडेशनच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित एकल महिलांनीही आपले मनोगत व्यक्त करताना आयुष्यातील संघर्ष, जबाबदाऱ्या आणि अनुभव मांडले. त्यांच्या भावना ऐकताना उपस्थितांना त्यांच्या जगण्यातील वास्तवाची जाणीव झाली. महिलांना साडी आणि फराळाची भेट देतानाच त्यांच्याशी संवाद साधून आपलेपणाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

या उपक्रमासाठी हिरकणी महिला ग्राम संघ, कोंडी यांचे विशेष सहकार्य लाभले.

पालकमंत्री सरनाईक यांच्या शिधा वाटपामुळे दुष्काळग्रस्त आणि ऊसतोड मजुरांची दिवाळी झाली गोड!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधी - धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या स्वखर्चातून जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबांची आणि ऊसतोड मजुरांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी त्यामुळे पालकमंत्री सरनाईक यांच्या वतीने जिल्ह्यात शिधा वाटप अभियान राबविण्यात आला आहे त्याअनुषंगाने शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे जि.प. सदस्य अनंत लंगडे, अनंत वाघमारे, उपसरपंच विजय उर्फ सोनू कवडे, तंटामुक्ती अध्यक्ष कपिल कवडे यांच्या हस्ते कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी उपसरपंच मधुकर मिटकरी आणि उमेश शिंदे यांच्या शेतातील ऊसतोड मजुरांना आणि गावातील गरजुवंत शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी,विधवा महिला तसेच दुर्बल घटकातील वंचित समाजातील महिला पुरुष यांना शिधावाटप करण्यात आला दुष्काळाच्या संकटांमुळे शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांना अडचणीचा सामना करावा लागत आहे



म्हणून दिवाळीच्या सणाला या गोरगरीब कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा आणि त्यांच्या सणाचा गोडवा फुलावा या समाजीक बांधीलकितुन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी हा उपक्रम हाती घेत त्यांच्या स्वखर्चातून हा शिधा वाटप करण्यात आला या उपक्रमामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंब आणि मजुरांना दिवाळीच्या सणात दिलासा मिळाला आहे तसेच समाजातील वंचित आणि गरजु घटकांच्या मदतीसाठी पालकमंत्री प्रताप सरनाईक सदैव तत्पर असल्याचा संदेश या उपक्रमामातुन देण्यात आला यावेळी राम शिंदे, दत्तात्रय जगताप, दत्तात्रय कवडे, अमोल बापूराव कवडे, रामराजे जगताप,महेश मीटकरी, उमेश शिंदे,हाणुमंत कवडे यांच्यासह गावातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री यांच्या शिधा वाटप अभियानांतर्गत शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे,जि.प. सदस्य अनंत लंगडे, अनंत वाघमारे, कन्हेरवाडी उपसरपंच विजय उर्फ सोनू कवडे, तंटामुक्ती अध्यक्ष कपिल कवडे यांच्या हस्ते उमेश शिंदे आणि माजी उपसरपंच मधुकर मिटकरी यांच्या शेतातील ऊसतोड मजुरांना शिधाकिटचे वाटप करण्यात आले सणासुदीच्या काळात आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीचा सामना करणाऱ्या परजिल्ह्यातुन आलेल्या मजुरांना या उपक्रमामुळे मदतीचा हात मिळाला आहे हा उपक्रम म्हणजे राजकारण नव्हे तर समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत मदतीचा हात देणे आणि गोरगरीबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हिच सरनाईक यांची समाजीक बांधीलकी आहे.

बोरमळी येथे जलसंपदा मंत्री यांचा सहपरिवार दिवाळी उत्सवात सहभाग

आदिवासी बांधवांसोबत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी साजरी केली दीपावली

फराळ वाटप व स्नेहभोजनातून जपली माणुसकीची नाती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

जळगाव : दीपावली हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण आहे. हा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या भावनेतून जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी यावल तालुक्यातील बोरमळी येथे आदिवासी बांधवांसोबत सहपरिवार, सहकुटुंब दीपावली साजरी केली.

यावेळी आदिवासी पाड्यावरील बंधू-भगिनींना मंत्री श्री महाजन हस्ते दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांनी सर्वांसोबत स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

दिवाळीच्या निमित्ताने आदिवासी बांधवांच्या भेटीला गेलेल्या मंत्री महाजन यांनी ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधला. फराळ वाटपाच्या माध्यमातून केवळ सणाचा आनंदच नव्हे, तर आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा भावही त्यांनी जपला.



यावेळी उपस्थितांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रेमळ संवादामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

समाजातील प्रत्येक घटकाला सण-उत्सवांचा आनंद घेता यावा, प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, समाधान आणि समृद्धी नांदावी, हीच या दीपोत्सवामागील भावना असल्याचे यावेळी दिसून आले.

माणुसकीचे नाते जपत समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन सण साजरा करण्याचा त्यांचा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष आनंददायी ठरला. आदिवासी बांधवांसोबतच्या या स्नेहपूर्ण सहवासामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचा व समाधानाचा भाव दिसून आला.

यावेळी आमदार अमोल जावळे, जामनेरच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन यांच्यासह विविध पदाधिकारी तसेच आदिवासी बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

मंगळवार दि. १० नोव्हेंबर २०२६ ४

पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत प्रत्येक सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांचे घर मंजूर : पालकमंत्री जयकुमार गोरे

पहिल्या टप्प्यात २१३ सफाई कामगारांच्या घरांसाठी ५६ कोटींचा निधी मंजूर; प्रत्येक कामगाराला हक्काचे घर देण्यासाठी शासन प्रयत्नशील





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर, दि. ९ (जिमाका) : पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फुटांचे हक्काचे घर देण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्येक सफाई कामगाराने स्वतःच्या हक्काच्या घरात राहावे, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पंढरपूर येथे दिवाळीनिमित्त सफाई कामगारांसोबत फराळाचा कार्यक्रम आणि त्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पालकमंत्री बोलत होते. यावेळीआमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, माजीआमदार प्रशांत परिचारक, कामगार नेते गुरु देवडी, दिग्विजय बागल, समाधान देशमुख दिलीप धोत्रे, नगरसेवक अनिल सावंत, नगरसेवक नागेश भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह मोठ्या संख्येने सफाई कामगार उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, अतिरिक्त १५० सफाई कामगारांचा जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी यांनी हा प्रस्ताव मंजूर करून कामगारांना दिवाळीची भेट द्यावी. यामध्ये काही अडचणी असतील, तर त्यातून मार्ग काढण्यात येईल. सफाई कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यास शासन सकारात्मक आहे.


पंढरपूरची आषाढी वारी स्वच्छ आणि सुंदर वारी म्हणून महाराष्ट्रासह देशात आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करीत आहे. मागील दोन-तीन वर्षांपासून आषाढी वारीच्या स्वच्छतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामध्ये सफाई कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आषाढी वारीदरम्यान आपण उत्कृष्ट स्वच्छतेचे काम केल्यामुळे पंढरपूर स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत झाली. या कामामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्री म्हणून आपलेही कौतुक होत आहे. मात्र, या यशाचे खरे शिलेदार सफाई कामगार आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनीही सफाई कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कामगारांना त्यांच्या हक्काची घरे लवकरात लवकर मिळावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिराज उबाळे यांनी केले. त्यांनी २००७ पासून सफाई कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेत त्यांच्या विविध समस्या मांडल्या. तसेच कामगारांना हक्काचे घर मिळावे, अशी मागणी केली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने महिला सफाई कामगारांना भाऊबीजेची भेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आली. तसेच पुरुष सफाई कामगारांना दिवाळी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि उपस्थित मान्यवरांनी सफाई कामगारांसोबत दिवाळीचा फराळ घेतला. प्रारंभी महिला कामगारांनी दिवाळीनिमित्त पालकमंत्री महोदय यांचे औक्षण केले. जयाभाऊ क्रिकेट स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ४०-१६ या संघाने जिंकल्याबद्दल त्या संघाचे चषक देऊन पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

दीपावली निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर - वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. आज पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, नाम, कौस्तुभमणी, दंडपेठया जोड, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच मोठा, शिरपेत लहान, तोडे जोड, मस्त्य जोड, मोठा लक्ष्मी हार, तुळशीची माळ, बाजीराव कंठी, मारवाडी पेठयांचा, मोतीहार, मोत्याची कंठी इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस सोन्याचे मुखवट, वाक्या जोड, तोडे जोड, ताणवाड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार,मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पारंपरिक अलंकाराच्या वेशातील मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्री.श्रीकांत यादव यांनी सांगितले.

किल्ले स्पर्धेतून शिवरायांचा इतिहास जिवंत; मनसे कडून बालगोपाळांची कौतुक



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : दिवाळी आणि मुलगी बाळ गोपाळ यांनी केलेल्या किल्ल्यांची स्पर्धा व त्यांचे कौतुक करणे, शहरातील तरुण मित्रज्ञ, बंधू बहिणी व वडीलधारी मंडळी हे दिवाळीनिमित्त शिवाजी महाराजांच्या वेगवेगळ्या किल्ल्यांचे देखावे करत असतात त्याचबरोबर किल्ल्याची बांधणी ही करत असतात.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मनसेच्या वतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी शहरातील विविध भागात त किल्ल्यांना भेटी देऊन किल्ले बनवणाऱ्या सर्व तरुण-तरुणींना वडीलधारी मंडळी व बालगोपाळांना प्रोत्साहित करण्यात आले.

यावेळी किल्ले बनवलेल्या स्पर्धकाशी संवाद साधत त्यांनी केलेल्या भिंतीचे फोटो करण्यात आले. शिवरायांचा गड किल्ल्यांचा इतिहास नव्या पिढी पर्यंत पोचवण्याची ही स्पर्धा महत्वाची ठरत असून दिवाळी ही आनंदाच्या धुमधडाक्यात साजरी करण्यात येत आहे.

सायाळा येथे 'विद्यार्थी दिन' उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांना वही-पेनचे वाटप करत शिक्षणाचा दिला संदेश!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी साताऱ्याच्या प्रतापसिंह हायस्कूलमध्ये (राजर्षी शाहू महाराज विद्यालय) पहिल्यांदा शाळेत प्रवेश घेतला होता. या ऐतिहासिक स्मृतीप्रित्यर्थ ७ नोव्हेंबर हा दिवस राज्यभरात 'विद्यार्थी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर सिंदखेडराजा तालुक्यातील सायाळा नगरीतही विद्यार्थी दिन अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण: वही-पेनचे वाटप

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वही व पेनचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्य हातात पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आलेला आनंद पाहण्यासारखा होता.

शिक्षणाचे महत्त्व आणि प्रेरणादायी विचार

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व सविस्तरपणे पटवून दिले.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार अधोरेखित करत भाई शरद सरकटे म्हणाले की, शिक्षण हेच माणसाच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थिती न खचता जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपले उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. समाजात शिक्षणाविषयी जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

मान्यवरांची विशेष उपस्थिती

या प्रेरणादायी सोहळ्याला सायाळा परिसरातील ग्रामस्थ, पालक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची शोभा वाढवणाऱ्या प्रमुख मान्यवरांमध्ये खालील व्यक्तींचा समावेश होता:

राजेश सरकटे सर, भाई प्रकाश सुखधाने, प्रवीण सरकटे (उपसरपंच), रामदास भाऊ आव्हाळे (माजी सरपंच), माणिकदादा सरकटे, डॉ. गवई, धनुभाऊ आव्हाळे, सचिन जाधव, माधवराव सरकटे यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उत्साहात सांगता

कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि शिक्षणाप्रती त्यांच्यामध्ये निर्माण झालेला उत्साह यामुळे संपूर्ण वातावरण भारून गेले होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणाऱ्या भाई शरद सरकटे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि राष्ट्र व समाज उभारणीत शिक्षणाचे योगदान मोलाचे असल्याचे सांगत कार्यक्रमाची सांगता केली.

टोलवसुली मात्र जोरात; पथदिवे लावण्याची जबाबदारी कोणाची?

ऐन दिवाळीतही पडघा हायवे वळणावर अंधार!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : दिवाळीचा सण सर्वत्र दिव्यांच्या रोषणाईने आणि प्रकाशाच्या झगमगाटाने साजरा होत असताना मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील पडघा टोल नाक्यापासून अवघ्या १०० ते १५० मीटर अंतरावर असलेल्या पडघे गावाच्या मुख्य वळणावर अद्याप पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नसून, अंधाराचे साम्राज्य कायम आहे. विशेष म्हणजे, या गंभीर समस्येकडे लक्ष वेधून लोकधारा प्रतिष्ठानने आठ महिन्यांपूर्वीच पथदिवे बसविण्याची मागणी केली होती. मात्र आठ महिने उलटूनही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पडघा टोल नाक्याजवळील बिकानेर दुकानासमोरील मुख्य वळण तसेच नाशिककडून शेरेकर पाडा मार्गे पडघे गावात प्रवेश करणाऱ्या मार्गावर रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अंधार असतो. या मार्गावरून दुचाकी, चारचाकी आणि अवजड वाहनांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत गावाकडे वळण घेताना वाहनचालकांना रस्त्याचा आणि वळणाचा अंदाज येणे कठीण होते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पादचारी आणि कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या महामार्ग क्रमांक ३ च्या प्रकल्प संचालकांकडे ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठवून पडघा टोल नाक्यापासून सुमारे १०० ते २०० मीटर परिसरातील दोन्ही बाजूंच्या पडघे गावाच्या मुख्य वळणांवर पथदिवे बसविण्याची मागणी केली होती. मात्र या मागणीला तब्बल आठ महिने उलटूनही अद्याप प्रकाशव्यवस्था करण्यात आलेली नाही.

एकीकडे टोलवसुली नियमितपणे सुरू असताना दुसरीकडे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या पथदिव्यांची व्यवस्था का केली जात नाही? अपघात घडल्यानंतरच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या महामार्ग क्रमांक ३ च्या प्रकल्प विभाग व प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ऐन दिवाळीत गावाच्या प्रवेशद्वारावर अंधार कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. अपघात होण्याची वाट न पाहता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने या ठिकाणी पथदिवे बसवावेत आणि नागरिकांचा सुरक्षित प्रवास सुनिश्चित करावा, असे नागरिकांचे म्हणणे आहे.